संपूर्ण माणदेशात एकाचवेळी प्रसिध्द होणारे एकमेव दैनिक

mandeshexpressatp@gmail.com

दैनिक माणदेशी बुलंद आवाज..

# माणदेश एक्सप्रेस

संपादक : दिपक गौतम प्रक्षाळे
मोबा. ९५९५०४७६७६/९५०३६३८६८६

www.mandeshexpress.com




● वर्ष : ७ वे ● ● अंक : ८१ वा ● ● रविवार दि. ३ डिसेंबर २०२३ ● ● किंमत २ रु ● पाने : ४ ● RNI : MAHMAR/2017/77021 Postl Reg : SGL/143/2023-2025

# मनोज जरांगे-पाटलांकडून अटकेचा दावा

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**मुंबई :** मराठा आरक्षणावरून राज्यात घमासान सुरू आहे. काही दिवासंपूर्वी बीडमध्ये हिंसाचार झाला होता. आमदारांची घरे जाळण्यात आली होती. यामागे मराठा समाजातील आंदोलकांचा हात असल्याचा आरोप केला जात आहे. दरम्यान, या प्रकरणावरून मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांना अटक होऊ शकते अशी अटकळ बांधली जात आहे. तर, येत्या दिवसांत काहीही होऊ शकतं, असं संजय राऊत म्हणाले आहेत. परंतु मनोज जरांगे पाटील यांच्या या आरोपांवर शिंदे गटाचे आमदार गुलाबराव पाटील यांनी प्रत्युत्तर दिले आहे. मनोज जरांगे पाटील सगळीकडे सभा घेत आहेत. ओबीसीच्या नोंदी सापडलेल्यांना प्रमाणपत्रे देणार असे सरकारने जाहीर केलं आहे. त्यामुळे



जरांगे पाटील

त्यांच्या मनात अटकेची भीती येऊ नये, असं आश्वासन गुलाबराव पाटलांनी दिलं. राऊतांच्या विधानावर त्यांनी प्रत्युत्तर दिलं की, राऊतांना कामं नाहीय. ते सुशिक्षित बेरोजगार आहेत. त्यांचं कामच आहे बोंबलायचं.

मराठा आंदोलकांवरील गुन्हे दोन दिवसांत मागे घेतो, असं सरकारने म्हटले होते. पण त्यांनी गुन्हे मागे घेतले नाहीत. त्यामुळे माझ्या अटकेची शक्यताही असू शकते. पण मला अटक करणं सरकारला तेवढं सोपं जाणार नाही. मला अटक करायची असेल तर करू द्या. मी तुरुंगात जायला घाबरत नाही. मला अटक झाल्यावर मराठा समाज काय आहे? हे सरकारला कळेल, अशा शब्दांत मनोज जरांगेंनी सरकारला इशारा दिला आहे. मराठा आंदोलकांच्या अटकेबाबत मनोज जरांगे म्हणाले, मुख्यमंत्र्यांना आणि गृहमंत्र्यांना आम्ही विनंती केली आहे, की आंदोलकांची अटक थांबवा. बीडमध्ये जे घडलं ते सत्य आहे. त्याचं आम्ही कधीही समर्थन केलं नाही. पण तुम्ही निष्पाप लोकांना तुरुंगात टाकलं आहे. तीन-चार हजार लोकांच्या याद्या केल्या आहेत. काही पोलिसांची जात उफाळून आली आहे. पोलिसांना कोणतीही जात नसते आणि नसायलाही पाहिजे असे जरांगे पाटील म्हणाले.

# आम. पडळकर यांनी घेतली जतच्या धनगर आंदोलकांची भेट

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**जत :** धनगर आरक्षण अंमलबाजवणीसाठी जत तहसील कार्यालयासमोर अशोक गोरड यांचे उपोषण सलग सहाव्या दिवशी सुरू असून आमदार गोपीचंद पडळकर यांनी या ठिकाणी भेट देत उपोषणकर्त्याला आंदोलन मागे घेण्याचे आवाहन केले, परंतु ठोस आश्वासन न मिळाल्याने अशोक गोरड यांनी उपोषण मागे घेण्यास नकार दिला.



जत : येथे आमदार पडळकर यांनी धनगर आरक्षण बाबत आमरण उपोषण करणाऱ्या अशोक गोरड यांची भेट घेतली.

आंदोलक अशोक गोरड यांनी धनगर आरक्षणाच्या समावेशची गठीत केलेल्या समितीच्या शासन आदेशाची शुध्दीपत्रक काढून धनगर आरक्षण अंमलबजावणी समिती करून शासन आदेशाचे शुधिपत्रक जाहीर करावे अये आवाहन केले होते. काल शनिवार दिनांक ०२ रोजी आ. गोपीचंद पडळकर यांनी भेट दिली.

# 'मुख्यमंत्री- माझी शाळा, सुंदर शाळा' अभियानाचा ५ डिसेंबरपासून प्रारंभ - मंत्री दीपक केसरकर

**मुंबई :** राज्यातील शाळांमध्ये पायाभूत सोयीसुविधा वाढविणे, शाळांमध्ये शिक्षणाबाबत स्पर्धात्मक वातावरण तयार करणे, निर्णय प्रक्रियेत विद्यार्थ्यांचा सहभाग वाढविणे, आरोग्य, पर्यावरण, कौशल्य विकास, आर्थिक साक्षरता या विषयांवर उपक्रम राबविण्यासाठी शाळांना प्रोत्साहित करणे यासाठी राज्यात 'मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा' अभियानाचा ५ डिसेंबरपासून प्रारंभ करण्यात येणार आहे, अशी माहिती शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी दिली.

जवाहर बालभवन येथे आज पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विभागाचे प्रधान सचिव रणजितसिंह देओल उपस्थित होते.

या अभियानासोबतच दत्तक शाळा योजना, महावाचन उत्सव- महाराष्ट्रातील वाचन चळवळ, माझी शाळा माझी परसबाग, स्वच्छता मॉनिटर टप्पा - २ या उपक्रमांचा शुभारंभदेखील ५ डिसेंबर २०२३ रोजी सकाळी ११ वाजता राज्यस्तरीय कार्यक्रमात राजभवन, मुंबई येथे करण्यात येणार आहे, असे मंत्री श्री.केसरकर यांनी सांगितले.

याबाबत माहिती देताना मंत्री श्री. केसरकर म्हणाले, उद्घाटन समारंभाचे अध्यक्षस्थानी राज्यपाल रमेश बैस असणार आहेत. तर उपक्रमांचा शुभारंभ मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते होणार आहे. प्रमुख पाहुणे म्हणून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार असणार आहेत. तसेच विशेष अतिथी म्हणून उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन, कृषी मंत्री धनजंय मुंडे, कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा उपस्थित राहणार आहेत. हे अभियान बृहन्मुंबई महानगरपालिका आणि अ व ब वर्गाच्या महानगरपालिका कार्यक्षेत्रातील शाळा आणि उर्वरित महाराष्ट्रातील शाळा अशा स्तरांवर राबविण्यात येणार आहे. महानगरपालिका क्षेत्रात विभाग व राज्यस्तर, तर उर्वरित महाराष्ट्रात तालुका,



जिल्हा, विभाग व राज्यस्तरावर विजेती शाळा निवडण्यात येणार आहे. या अभियानातून २ कोटी मुलांपर्यंत पोहोचण्यात येणार आहे. स्पर्धेसाठी सर्व स्तरावरील समित्यांची स्थापना करण्यात आली आहे.

मंत्री श्री. केसरकर म्हणाले, दत्तक शाळा योजनेत मोठमोठे उद्योग समूह सीएसआर (सामाजिक उत्तरदायित्व) निधीच्या उपयोगातून शाळांमध्ये पायाभूत सोयी - सुविधा अद्ययावत करून देणार आहेत. या योजनेतून कुठल्याही प्रकारे शाळांचे खाजगीकरण करण्यात येणार नाही. केवळ शाळांमध्ये चांगल्या दर्जाच्या पायाभूत सोयीसुविधा अद्ययावत करण्याचा यामागील उद्देश आहे. महावाचन उत्सव - महाराष्ट्रातील वाचन चळवळ या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये वाचन संस्कृती वाढविण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांना वाचनातून प्रगल्भ करण्याचा उद्देश आहे. उच्च शिक्षण विभागाच्या राज्यात असलेल्या विविध ग्रंथालयांना या उत्सवासाठी शाळांसोबत संलग्न करण्यात येणार आहे. वाचन उत्सवातून विद्यार्थ्यांचा प्रतिसादही जाणून घेण्यात येणार आहे.

माझी शाळा - माझी परसबाग उपक्रमाविषयी माहिती देताना मंत्री श्री. केसरकर म्हणाले, या उपक्रमातून शाळांमध्ये परसबाग तयार करण्यात येत आहे. शाळांमध्ये परसबाग असणे सक्तीचे करण्यात आले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शेतीबद्दलचे ज्ञान वाढेल, त्यांना प्रत्यक्ष अनुभव घेता येईल, शेतीबद्दलचे आकर्षण वाढेल. परसबागेत भाजीपाला उत्पादनासाठी कृषी विभागामार्फत बिया पुरविण्यात येतील. परसबागेत उत्पादित भाजीपाल्याचा समावेश 'पोषण आहार' मध्ये करण्यात येईल. यात आठवड्यातून एक दिवस अंडी, भात किंवा भरडधान्यापासून बनविलेल्या पदार्थाचा समोवश करण्यात येणार आहे.

ते पुढे म्हणाले, स्वच्छता मॉनिटर उपक्रमाचा दुसरा टप्पा सुरू करण्यात येणार आहे. या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेचा संस्कार रुजत आहे. स्वच्छतेसाठी विद्यार्थी आग्रही होत आहेत. हा सकारात्मक बदल दिसून येत आहे.

शालेय शिक्षण विभागाच्या महत्त्वाच्या उपक्रमांचा शुभारंभ ५ डिसेंबर रोजी होत आहे. या उपक्रमांमध्ये शाळांनी उत्स्फूर्त सहभाग घ्यावा, असे आवाहनही मंत्री दीपक केसरकर यांनी यावेळी केले.

# विवाहतेच्या आत्महत्या प्रकरणी पती, सासू,सासरे, दीर यांच्यावर गुन्हे दाखल

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**आटपाडी/प्रतिनिधी :** आटपाडी शहरातील इंदिरानगर येथे राहणाऱ्या मोना संतोष पवार हिने राहत्या घरी गळफास घेत आत्महत्या केली होती. याप्रकरणी आता आटपाडी पोलिसात तीचा पती, सासू, सासरे यांच्यासह एका महिलेवर आटपाडी पोलिसात गुन्हे दाखल झाले आहेत.

याबाबत अधिक माहिती अशी, आटपाडी शहरातील इंदिरानगर येथे मोना ही तीचा पती, सासू, सासरे येथे राहण्यास होती. दिनांक ०१ रोजी राहत्या घरी गळफास घेत आत्महत्या केली होती. याबाबत आटपाडी पोलिसात गुन्हा आत्महत्या केल्या गुन्हा नोंद झाला होता. मोना हिने आत्महत्या केल्यानंतर तिच्या नातेवाईकांनी आटपाडी येथे धाव घेत मोना हिने आत्महत्या केली नसून तिचा छळ केला असल्याचा आरोप केला होता. यामध्ये जागा खरंदी करणेसाठी माहेरंकडुन पैसे घेवुन ये, तसेच तिचे चारित्र्यावर संशय घेवून तिला शारिरीक, मानसिळ त्रास देवून तिचा जाचहाट करून तिला आत्महात्या करण्यास प्रवृत्त केले असून यातूनच तीने आत्महत्या केली असल्याचा आरोप करत तीचा पती, सासू, सासरे, दीर यांच्यावर गुन्हा दाखल करावा यासाठी आटपाडी पोलीस ठाणे येथे धाव घेतली होती.

त्यामुळे आज दिनांक ०२ रोजी मोना हिचा पती संतोष नामदेव पवार, सासू, सुनिता नामदेव पवार, दीर, अमर नामदेव पवार, आजेसासू मंगल चव्हाण सर्व रा. इंदिरानगर आटपाडी ता. आटपाडी, जि. सांगली या आरोपी विरुद्ध कलम ४९८, ३०४,(व) ३४ प्रमाणे गुन्हा नोंद झाला असून पोलीस अधिक तपास करत आहेत.

Email - netra7676@gmail.com
डिजीटल जम्बो
नेत्रा कलर झेरॉक्स्
७/१२ उतारे, सर्व शासकीय फॉर्म, मराठी टायपिंग
धिरज, 9503 63 8686 दिपक, 9595 04 7676 गाळा नं. ११

# मी पक्षाचा अध्यक्ष

## शरद पवार : मला कुणाच्या परवानगीची गरज नाही

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**पुणे :** कर्जतमध्ये झालेल्या बैठकीत अजित पवारांनी शरद पवार यांच्यावर शरसंधान केलं. या पार्श्वभूमीवर पुण्यात शरद पवार यांनी पत्रकार परिषद घेत अनेक प्रश्नांना दिलखुलास उत्तरे दिली. आपल्या पत्रकार परिषदेच्या सुरुवातीला शरद पवार यांनी राज्याच्या अवकाळी परिस्थितीवर भाष्य केले. राज्यात अवकाळीमुळे झालेल्या नुकसानाची तीव्रता पाहता त्याच्या पंचनाम्याचा वेग अत्यंत कमी आहे. यावेळी अजित पवार यांनी काल अनेक गौप्यस्फोट केले. यावर बोलताना शरद पवार म्हणतात, ' मी राजीनामा देतो म्हणायचे कारण काय ? मी पक्षाचा अध्यक्ष आहे. राजीनामा दिल्यानंतर मागे घ्या म्हणून आंदोलन करा हे सांगायची गरज काय ? मला माझ्या पक्षात कुणाच्या परवानगीची गरज नाही. त्यांनी बोललेल्या अनेक गोष्टी मला पहिल्यांदाच समजल्या आहेत. त्यात कोणतेही सत्य नाही. माझ्याकडून त्यांना कोणतेही बोलावणं गेलं नाही. त्यांच्या मागण्यासंदर्भात चर्चा जरूर झाली. पण त्यांनी निवडलेली भूमिका आमच्या पक्षाच्या विचारांशी सुसंगत नव्हती. लोकशाहीमध्ये प्रत्येकाला त्यांची भूमिका



शरद पवार

मांडण्याचा अधिकार आहे. कोणाला दुसऱ्या विचारधारेसोबत जाण्याचा अधिकार आहे. पण असं करताना यापूर्वीचा निवडणुकीचा फॉर्म त्यांनी राष्ट्रवादीच्या नावाने भरला. राष्ट्रवादीच्या नावाने मतं मागितली. पण भूमिका मात्र पक्षाच्या विचारांशी विसंगत घेतली याचं वैषम्य वाटतं.

शरद पवार यांनी आजच्या बैठकीत लोकसभेसाठी मतदारसंघांचा आढावा घेतल्याचं समोर येत आहे. विशेष म्हणजे अजित पवार यांनीही बारामती, शिरूर, सातारा आणि रायगड इथून निवडणूक लढवण्याबाबत काल भाष्य केलं होतं. यावर माध्यमांनी छेडलं असता शरद पवार म्हणाले, लोकशाही नुसार कोणत्याही पक्षाच्या नेत्याला कोणत्याही मतदारसंघातून भूमिका मांडण्याचा अधिकार आहे. त्याबाबत तक्रार करण्याचे कोणतेच कारण नाही.

मी गेली ६० वर्षं राजकारणात आहे. हा पक्ष कुणी स्थापन केला, वाढवला हे सगळ्यांना माहिती आहे. माझ्याबाबत पक्षात, मतदारसंघात किंवा जनतेला सर्व प्रकारची माहिती आहे. त्यामुळे हा पक्ष कोणाचा आहे याबाबत इतरांनी कितीही, कोणतेही दावे केले तरी सत्य काय आहे ते सर्वांनाच माहिती आहे असे सांगत अजित पवार यांना फटकारले.

# खरसुंडीच्या श्री सिद्धनाथाला प्रथमच डाळिंबाची आरास

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**आटपाडी/प्रतिनिधी :** श्री क्षेत्र खरसुंडी येथे सिद्धनाथ मंदिरात प्रथमच डाळिंबाची आरास करण्यात आली. श्री नाथ जन्मोत्सव मंगळवार दि.५ रोजी संपन्न होणार आहे. त्या निमित्त मंदिरात श्रीनाथ जन्माष्टमी सप्ताह सुरू असून या सप्ताहाचे निमित्त साधून श्री सिद्धनाथांच्या पूजेस डाळिंबांची आकर्षक आरास करण्यात आली. यावेळी श्री सिद्धनाथांची सफेद रंगाच्या पोशाखात केलेली अश्वारूढ पूजा आकर्षक दिसत होती. तर देवी मातेस डाळिंबी रंगाची साडी परिधान करण्यात आली होती. माणदेशचा राजा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्री सिद्धनाथांना प्रथमच डाळिंबाचा अभिषेक केल्याची भावना भक्तगणातून व्यक्त होत होती.

या पूजेसाठी आटपाडीतील मंगलमूर्ती फ्रुट कंपनीचे पंढरीनाथ नागणे यांनी दर्जेदार डाळिंबाचा पुरवठा केला. ही पूजा पाहण्यासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. या पूजेसाठी श्रीपूजक किशोर पुजारी, ॲड. प्रतीक पुजारी, गणेश पुजारी, जीवन पुजारी, प्रमोद पाटील, प्रथमेश अमित पुजारी, निलेश पोमधरणे, ज्ञानेश्वर पाटील, सतीश भांगे,



आटपाडी : खरसुंडीच्या श्री सिद्धनाथाला करण्यात आलेली डाळिंबाची आरास

प्रदिप पुजारी, सत्यम टांकसाले, आग्नेन पुजारी आदी श्रीपुजकांचे सहकार्य लाभले. ही पूजा पाहून भाविकांनी समाधान व्यक्त केले.



## संपादकीय

# 'मिचॉन्ग' चक्रीवादळाचा धोका

पुढील २४ तासांत बंगालच्या उपसागरात चक्रीवादळ तयार होण्याची शक्यता आहे. २ ते ४ डिसेंबर या काळात देशात अनेक ठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता आहे. बंगालच्या उपसागरात तयार झालेले कमी दाबाचे क्षेत्र आणि वेस्टर्न डिस्टर्बन्स यामुळे हवामानात मोठा बदल होताना दिवस आहे. राज्यासह देशभरात अनेक ठिकाणी अवकाळी पावसाची हजेरी पाहायला मिळत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचं मोठ्या प्रमाणात नुकसान झालं आहे. पुढील २४ तासांत बंगालच्या उपसागरात तयार झालेल्या कमी दाबाच्या पट्ट्याचं चक्रीवादळ तयार होण्याची शक्यता आहे. २ ते ४ डिसेंबर या काळात देशात अनेक ठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता आहे. त्यामुळे आज आणि उद्या महाराष्ट्रासह राज्यात अनेक ठिकाणी पावसाची हजेरी पाहायला मिळणार आहे.
भारतीय हवामानशास्त्र विभागाने दिलेल्या माहितीनुसार, दक्षिणपूर्व बंगालच्या उपसागरात तयार झालेले कमी दाबाचे क्षेत्र पुढील २४ तासांत अधिक तीव्र होण्याची अपेक्षा आहे. पुढील २४ तासांत बंगालच्या उपसागरात चक्रीवादळ तयार होण्याची शक्यता आहे. या हवामानामुळे पुढील दोन दिवसांत मध्य प्रदेश आणि महाराष्ट्रात विजांच्या गडगडाट आणि वादळी वाऱ्यासह पाऊस पडण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. याशिवाय, वेस्टर्न डिस्टर्बन्सचा प्रभावही कायम राहणार आहे, यामुळे पर्वतीय प्रदेशात बर्फवृष्टी होईल आणि लगतच्या मैदानी प्रदेशात थंडीची लाट येईल. कमी दाबाचे क्षेत्र चेन्नईच्या ८०० किमी आग्नेय, पुद्दुचेरीच्या सुमारे ७९० किमी पूर्व-दक्षिणपूर्व अक्षांश ९.१ अंश उत्तर आणि रेखांश ८६.४ अंश पूर्वेजवळ दक्षिणपूर्व शेजारील नैऋत्य बंगालच्या उपसागरावर केंद्रित झालं आहे. हे कमी दाबाचे क्षेत्र पुढील २४ तासांत चक्रीवादळात रुपांतरित होण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. यामुळे दक्षिण आंध्र प्रदेश आणि लगतच्या उत्तर तामिळनाडू किनारपट्टीला याचा धोका आहे, असा अंदाज भारतीय हवामान विभागाने वर्तवला आहे.
तामिळनाडू, पुद्दुचेरी आणि कराईकल किनारपट्टीसाठी हवामान कार्यालयाकडून ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. २ ते ४ डिसेंबर या काळात मुसळधार पावसाची शक्यता आहे. तामिळनाडूतील चेंगलपट्टू, कांचीपुरम आणि तिरुवल्लूर जिल्ह्यात जोरदार पाऊस होणयाची शक्यता आहे. ४ डिसेंबरपर्यंत उत्तर किनारपट्टीवरील तामिळनाडू आणि पुद्दुचेरीमध्ये बहुतेक ठिकाणी मुसळधार पावसासह हलका ते मध्यम पावसाच्या सरी कोसळण्याची शक्यता आहे. २ ते ४ डिसेंबर दरम्यान मुसळधार पाऊस पडण्याचा अंदाज आहे. ३ आणि ४ डिसेंबरला आंध्र प्रदेशात दक्षिण किनारपट्टी भागात अनेक ठिकाणी हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे. बहुतेक ठिकाणी हलका ते मध्यम स्वरुपाचा पाऊस पडण्याची शक्यता आहे.

# निरंतर शिक्षण हेच प्रत्येक विद्यार्थ्याचे ध्येय असावे

## राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू : राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा १११ वा दीक्षान्त समारंभ

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**नागपूर :** भारतीय मूल्यांना अनुसरून सर्वांना उच्च व गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे हा राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा मूळ उद्देश आहे. यामुळे देश एक वैश्विक ज्ञानशक्ती (ग्लोबल नॉलेज पॉवर) म्हणून स्थापित होईल,असा विश्वास राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज येथे व्यक्त केला. औपचारिक पदवी हे शिक्षणाचे अंतिम उद्दिष्ट नसून वेगाने बदल घडणाऱ्या जगात निरंतर शिक्षण हेच प्रत्येक विद्यार्थ्याचे ध्येय असावे, असे आवाहनही त्यांनी केले.
राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या प्रमुख उपस्थितीत कविवर्य सुरेश भट सभागृहात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या १११ व्या दीक्षान्त समारंभाचे आयोजन करण्यात आले. यावेळी त्या बोलत होत्या.
कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राज्यपाल तथा कुलपती रमेश बैस होते तर केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांतदादा पाटील, कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी आदी यावेळी उपस्थित होते.
तंत्रज्ञान आपल्या जीवनाचा अविभाज्य घटक असून त्यामुळे सर्व क्षेत्रात बदल घडत आहेत, असे सांगून राष्ट्रपती म्हणाल्या तंत्रज्ञानाच्या सदुपयोगाने देश व समाजाचे हित जोपासले जाऊ शकते तर त्याच्या दुरुपयोगाने मानवतेचे नुकसान होऊ शकते. सध्याच्या काळात कृत्रिम बुद्धिमत्तेचा (एआय) उपयोग आपले जीवन सुकर करत आहे परंतु यातून निर्माण होणारा डीपफेकसारखा प्रकार सामाजिक स्वास्थासाठी अत्यंत घातक आहे. तंत्रज्ञानाच्या चुकीच्या उपयोगाने निर्माण होणाऱ्या समस्येच्या पार्श्वभूमीवर नैतिक शिक्षणाचा मार्ग उपकारक असल्याचे त्यांनी आवर्जून सांगितले.
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाची शतकी वाटचाल उच्च परिमाणे स्थापित करणारी ठरली असून समृद्ध वारसा जोपासणाऱ्या या विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी जीवनाच्या विविध क्षेत्रात महत्त्वाचे योगदान दिल्याचा गौरवास्पद उल्लेख करुन राष्ट्रपती म्हणाल्या, विद्यापीठाचे माजी विद्यार्थी अनेक क्षेत्रात अग्रेसर आहेत. त्यांचे सहाय्य घेऊन विद्यापीठाला ग्लोबल सेंटर ऑफ एक्सलंस बनवावे.या विद्यापीठाने राष्ट्रीय शैक्षणिक धोरण लागू केले हे प्रशंसनीय आहे. देशाच्या विकासात संशोधन व नाविन्यतापूर्ण शिक्षणाची मोलाची भूमिका असून हे विद्यापीठ संशोधन, नाविन्यतापूर्ण शिक्षण व तंत्रज्ञानाला प्रोत्साहन देत आहे. याचे उत्तम उदाहरण म्हणजे या विद्यापीठातील फॅक्लटी मेंबर्सच्या नावाने ६७ हून अधिक पेटंटची नोंदणी झालेली आहे. विद्यार्थ्यांमध्ये स्टार्टअपला प्रोत्साहन देण्यासाठी विशेष कक्ष निर्माण केला आहे. स्थानिक प्रश्न आणि गरजा लक्षात घेऊन संशोधनावर भर द्यावा, असे आवाहनही त्यांनी केले.
विज्ञान व तंत्रज्ञान विद्या शाखेतून डि.एससी. पदवी प्राप्त करणारे डॉ. रामचंद्र हरीसा तुपकरी आणि डॉ. टि. व्ही. गेडाम सुवर्णपदक आचार्य पदवी प्राप्त विद्यार्थिनी राजश्री ज्योतीदास रामटेके यांना राष्ट्रपतींच्या हस्ते पदक देऊन गौरविण्यात आले. विद्या शाखानिहाय १२९ संशोधकांना या कार्यक्रमात आचार्य पदवी देऊन सन्मानित करण्यात आले. कुलगुरु डॉ सुभाष चौधरी यांनी प्रास्ताविक केले.



नागपूर : राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या १११ व्या दीक्षान्त समारंभ कार्यक्रमात बोलताना राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू

स्वच्छ भारत, सुंदर भारत
स्वच्छ घर, सुंदर घर
खुषखबर! खुषखबर!! खुषखबर!!!
आम्ही आपल्यासाठी घेवून आलो आहोत...........
माणगंगा
सेफ्टीटँक ड्रेनेज क्लीनिंग सर्व्हिस
आपली संडास टाकी, शोषखड्डा, गोबर गॅस टाकी भरलेली आहे का ......... ?
चिंता करू नका......
फक्त खाली दिलेल्या मोबाईल नंबरवर फोन लावा.
आपली संडास टाकी, आधुनिक मशिनच्या सह्याने एकदम वाजवी दरात स्वच्छ करून दिली जाईल.
किरण रणदिवे
7028723789/ 9921030708
टिप :- कृपया फोन करा व जहिरात जपून ठेवा, शेजाऱ्याना उपयोगात येईल.

# शिवसेना, राष्ट्रवादीला संपवणे हे संघाचे षडयंत्र : संजय राऊत

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**नाशिक :** राज्यात गेल्यावेळी लोकसभेच्या जिंकलेल्या जागा राष्ट्रवादी लढणार असल्याची उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केलेली घोषणा ही भाजपची भूमिका आहे. शिवसेना आणि राष्ट्रवादीला संपविण्याच्या षडयंत्राचा तो एक भाग आहे. संघाचे षडयंत्र असेच कपटी असते, असा आरोप ठाकरे गटाचे नेते खासदार संजय राऊत यांनी केला. पराभूत करू शकत नाही, त्यांचे पक्ष फोडा, त्यातून काही साध्य होत नसेल तर, मग संबधित पक्षांच्या प्रमुख नेत्यांचे चरित्र्यहनन करा, अशी भाजपची नीती आहे. अल कायदा या दहशतवादी संघटनेने काही देश, त्यातील नेत्यांवर खोटे आरोप, हल्ले करण्यासाठी असेच धोरण अवलंबल्याचा दाखला राऊत यांनी दिला.
दादा भुसे बदनामीप्रकरणी दाखल खटल्यात दोन वेळा गैरहजर राहिलेले राऊत हे शनिवारी मालेगाव येथील न्यायालयात हजर झाले. यावेळी प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना त्यांनी महाराष्ट्रातील राजकीय घडामोडींवरून भाजप आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला लक्ष्य केले. भाजप काही लोकांना हाताशी धरून आमचे पक्ष, नेतृत्व संपवण्यासाठी चरित्र्यहनन करत आहे. त्यातून त्यांना काही मिळणार नाही. उद्धव ठाकरे आणि शरद पवार हे दोन्ही नेते आणि त्यांचे पक्ष आजही भक्कमपणे उभे असल्याचा दावा त्यांनी केला. अजित पवार यांनी भाजपसोबत जाण्याविषयी शरद पवार यांच्या भूमिकेसंदर्भात केलेल्या विधानाचाही राऊत यांनी समाचार घेतला. शरद पवार यांनी सांगितले असताना मग तुम्ही परत का आलात, असा प्रश्न केला. शरद पवार हे पुरोगामी विचारांचे नेते आहेत. महाराष्ट्राच्या जडणघडणीत त्यांचे योगदान आहे. अजित पवार गटाकडून होणारे बेछूट आरोप ही भाजपने लिहून दिलेली संहिता असल्याकडे त्यांनी लक्ष वेधले. शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे उपनेते अद्वय हिरे हे सध्या ज्या तुरुंगाच्या कोठडीत आहेत, त्याच कोठडीत नाशिकचे सध्याचे पालकमंत्री दादा भुसे यांना २०२४ च्या निवडणुकीनंतर ठेवले जाईल, असा इशाराही त्यांनी दिला.



संजय राऊत







# भाजपाबरोबर जाण्यासाठी मुश्रीफ माझ्या घरी पाच तास बसले होते : अनिल देशमुख

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**मुंबई :** अनिल देशमुख माझ्याबरोबर सर्व बैठकांना उपस्थित होते. मात्र, मंत्रीपद न मिळाल्याने ते आमच्याबरोबर आले नाहीत, असा दावा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शुक्रवारी ( १ डिसेंबर ) केला होता. याला माजी गृहमंत्री अनिल देशमुखांनी प्रत्युत्तर दिलं आहे. भाजपाबरोबर जाण्यासाठी हसन मुश्रीफ माझ्या घरी पाच तास बसले होते. पण, मला त्रास देणाऱ्यांबरोबर मी कुठल्याही परिस्थितीत जाणार नव्हतो, असं देशमुखांनी स्पष्ट केलं.
अनिल देशमुख माझ्याबरोबर सर्व बैठकांना उपस्थित होते. 'मला मंत्रीमंडळात स्थान मिळालं पाहिजे,' असं देशमुखांनी म्हटलं होतं. पण, भाजपाकडून सांगण्यात आलं की, 'आम्ही देशमुखांवर सभागृहात आरोप केले आहेत. लगेच मंत्रीमंडळात त्यांना स्थान दिलं, तर आमच्या विश्वासार्हतेवर प्रश्न निर्माण होईल, त्यामुळे अनिल देशमुखांना घेता येणार नाही. मग, मंत्रीपदाच्या यादीतून देशमुखांचं नाव वगळलं गेलं. त्यावर देशमुखांनी सांगितलं, 'मला मंत्रीपद नाही तर मी तुमच्याबरोबर येणार नाही.' ही काळ्या दगडावरील पांढरी रेघ आहे, असं अजित पवारांनी म्हटलं होतं. दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी अजित पवारांच्या आरोपांना प्रत्युत्तर देण्यासाठी पुण्यात पत्रकार परिषद घेतली. तेव्हा अजित पवारांनी केलेल्या विधानावर देशमुखांनी स्पष्टीकरण दिलं आहे.
अनिल देशमुख म्हणाले, भाजपानं मला खोट्या प्रकरणात फसवलं होतं. त्यामुळे त्यांच्याबरोबर जाण्याचा प्रश्नच नव्हता. मला पाहिजे, ते खातं देण्याची त्यांची तयारी होती. तसेच, भाजपाबरोबर जाण्यासाठी हसन मुश्रीफ माझ्या घरी पाच तास बसले होते. पण, मला त्रास देणाऱ्यांबरोबर मी कुठल्याही परिस्थितीत जाणार नव्हतो. तसेच, मी शरद पवारांची साथ सोडणार नव्हतो.



अनिल देशमुख

दैनिक माणदेश एक्सप्रेस हे पत्रक श्री. शशिकांत बापूसाहेब कुंभोजकर यांनी प्रकाशक, मालक श्री. दीपक गौतम प्रक्षाळे यांच्यासाठी कुंभोजकर ऑफसेट प्रिंटर्स, २६२, महावीरनगर, सांगली. पीन ४१६४१६ महाराष्ट्र येथे छापून विठ्ठलनगर, आटपाडी, ता. आटपाडी, जि. सांगली पिन- ४१५३०१ महाराष्ट्र येथून प्रसिद्ध केले. या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इ. विषयी संपादक, मुद्रक, प्रकाशक, मालक सहमत असतीलच असे नाही. RNI Reg.No- MAHMAR/2017/77021 (आटपाडी न्यायकक्षेत)

संपूर्ण माणदेशात एकाचवेळी प्रसिध्द होणारे एकमेव दैनिक
mandeshexpressatp@gmail.com
दैनिक
माणदेशी बुलंद आवाज...
# माणदेश एक्सप्रेस






# वैद्यकीय संशोधन आणि आरोग्य सेवा क्षेत्रात देशाला अग्रणी करावे

## राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू : नागपूर शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या अमृत महोत्सवाचे उद्घाटन

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**नागपूर :** माफक दरातील सुलभ वैद्यकीय उपचार समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक असून कोविडसारख्या महामारीने मजबूत आरोग्य यंत्रणेची गरज अधोरेखित केली आहे. या पार्श्वभूमीवर वैद्यकीय संशोधन आणि आरोग्य सेवा क्षेत्रात देशाला अग्रणी बनविण्यासाठी निर्धाराने प्रयत्न करुन जागतिकस्तरावर नाविन्यपूर्णतेचे केंद्र म्हणून देशाची ओळख प्रस्थापित करावी, असे आवाहन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केले.

येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या (मेडिकल) अमृत महोत्सवाचे उद्धाटन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते झाले. या कार्यक्रमास राज्यपाल रमेश बैस, केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. राज गजभिये उपस्थित होते.

नव्या आधुनिक तंत्रज्ञानासोबतच कृत्रिम बुद्धिमत्तेच्या सहाय्याने वैद्यकीय क्षेत्रात नवे परिवर्तन घडविण्याची गरज प्रतिपादित करुन राष्ट्रपती म्हणाल्या की, वैश्विक स्तरावर सर्वांना उत्तम आरोग्य सुविधा देण्याचे ध्येय साध्य करण्यात डॉक्टरांची अपुरी संख्या हे एक



**नागपूर : येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या अमृत महोत्सवाचे उद्घाटन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, राज्यपाल रमेश बैस, मंत्री नितीन गडकरी, देवेंद्र फडणवीस, हसन मुश्रीफ व मान्यवर**

महत्वाचे कारण आहे. त्यामुळे वैद्यकीय सुविधांचा लाभ प्राप्त होण्यात असमानता निर्माण झाली आहे. ती दूर व्हावी यासाठी केंद्र सरकारकडून जिल्हा रुग्णालय संलग्नित वैद्यकीय महाविद्यालये सुरु करण्यास मदत केली जात आहे. यामुळे प्रादेशिक असमतोल आणि शहरी-ग्रामीण दरी कमी होण्यास मदत होणार आहे. तसेच आरोग्य सेवांच्या विकासासोबतच त्या परवडणाऱ्या असाव्यात, या उद्देशाने जगात सर्वात मोठी असणारी प्रधानमंत्री जन आरोग्य योजना राबविण्यात येत आहे. आयुष्मान भारत योजनेच्या माध्यमातून आरोग्य विषयक दस्तावेजांचे डिजिटायझेशन करण्याचे सरकारचे प्रयत्न प्रशंसनीय आहेत. त्यामुळे आरोग्य सेवा अधिक गुणवत्तापूर्ण होत असल्याचे त्यांनी सांगितले.

अवयवदानाबाबत समाजात पुरेशी जागरुकता नसल्याने गरजू रुग्णांना दीर्घकाळ प्रतीक्षा करावी लागत आहे. मात्र, त्यासोबतच अवैधरित्या अवयव विक्रीचे प्रकारही घडत असल्याबाबत खंत व्यक्त करुन वैद्यकीय क्षेत्राने अवयवदानासाठी जनजागृती करावी तसेच मानसिक आरोग्याच्या समस्येचाही सहानूभूतीने विचार करावा असे आवाहन राष्ट्रपतींनी केले.

मध्य भारतात गेल्या ७५ वर्षांपासून वैद्यकीय शिक्षण, संशोधन आणि आरोग्य सेवा प्रदान करण्यात मोलाचे योगदान दिल्याबद्दल शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाची त्यांनी विशेष प्रशंसा केली. या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी जीवनाच्या विविध क्षेत्रात समर्पित भावनेने काम करणाऱ्या वैद्यकांची मोठी फळी निर्माण केल्याचे गौरवोद्गार राष्ट्रपतींनी काढले.

तत्पूर्वी, महाविद्यालयांशी संबधित चार मान्यवरांचा राष्ट्रपतींच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या महाविद्यालयातून उत्तीर्ण पहिल्या तुकडीचे विद्यार्थी डॉ. बी. जे. सुभेदार, महाविद्यालयासाठी जमीन दान करणारे कर्नल डॉ. कुकडे यांचे नातू ड. दिनकर कुकडे आणि या महाविद्यालयाला मदत करणाऱ्या डॉ. शकुंतला गोखले यांचे नातेवाईक रवी लिमये व डॉ. प्रमोद गिरी यांचा राष्ट्रपतींच्या हस्ते सत्कार करण्यात आला. नवनिर्मित सभागृहाचे डिजिटल पद्धतीने उद्घाटनही करण्यात आले. विशेष डाक तिकिटाचे अनावरण करण्यात आले. राज्यपाल रमेश बैस यांच्या हस्ते स्मरणिका आणि कॉफी टेबल बुकचे प्रकाशन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अधिष्ठाता डॉ. राज गजभिये यांनी केले.

# मुलांची डोकी सुधारली की देश सुधारेल

## महादेवराव जानकर : शिक्षणामुळेच क्रांती करता येईल

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**म्हसवड/अहमद मुल्ला :** शिक्षणाशिवाय पर्याय नाही. शिक्षण चांगल्या प्रकारे मुलांना मिळाले पाहिजे. मुलांची डोकी सुधारली की देश सुधारेल, शिक्षणामुळेच क्रांती करता येईल. शिकेल तोच टिकेल जिल्हा परिषद शाळेतून गरीब शेतकरी व सामान्यांचीच मुले शिकत आहेत. श्रीमंताची, आमदार, खासदाची मुले चांगल्या कॉन्व्हेंट शाळेत शिक्षण घेऊन इंग्लड अमेरीकेत शिक्षणासाठी जात आहे. सामान्यांची मुले शिकली पाहिजेत त्यांना चांगले शिक्षण मिळाले पाहिजे यासाठी माझी तळमळ असल्याचे प्रतिपादन माजी मंत्री, राष्ट्रीय समाज पक्षाचे प्रमुख महादेव जानकर यांनी व्यक्त केले. वीरकरवाडी येथील जिल्हा परिषद शाळेकरिता त्यांच्या फंडातून १२ लाख रुपये निधी मंजूर करण्यात आलेल्या कामाच्या उद्धाटन सोहळ्या प्रसंगी व्यक्त केले.

यावेळी सातारा जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष अनिल देसाई, तहसिलदार विकास अहिरे, नायब तहसिलदार जंगम उपसभापती मार्केट कमिटी वैशाली विरकर, माजी नगराध्यक्ष तुषार विरकर, ग.शि.लक्ष्मण पिसे, किसन विरकर, इश्वरा विरकर, डॉ. बाळराजे विरकर, आप्पासाहेब पुकळे, गुलाबराव उगलमोगले, बबन दादा विरकर, दादासाहेब दोरगे आदी मान्यवर उपस्थित होते.

या वेळी बोलताना पुढे बोलताना जानकर म्हणाले, कर्मवीर भाऊराव पाटील आमच्या गावी आले नसते तर आम्हीही डॉक्टर, इंजिनियर झालो नसतो. यासाठी मी शिक्षणावर लक्ष केंद्रीत केले असून महाराष्ट्रातील अनेक



**म्हसवड : वीरकरवाडी येथील जिल्हा परिषद डिजिटल शाळा उद्घाटनप्रसंगी माजी मंत्री महादेव जानकर, अनिल देसाई व उपस्थित मान्यवर**

> पुढच्यावेळी तुमची माझी भेट होईल तेव्हा मी १०० टक्के रासपचा खासदारच असेन. जि.प.च्या शाळा टिकल्याच पाहिजे. त्या पटा अभावी बंद करता येणार नाही त्यात काय सुधारणा करता येईल ते पहावे. नुसते आमदार, खासदार, मंत्री होऊन चालणार नाही. सेक्रेटरी, अधिकारी चांगला नसेल तर काहीच होत नाही, अधिकारी महत्वाचा आहे.

जिल्हा परिषदेच्या डिजिटल शाळांसाठी मी आमदार फंडातून मोठ्या प्रमाणात फंडाचा वापर करत आहे. मंत्रालयात ७२ विभाग आहेत. त्या प्रत्येक विभागात माण मधीलच अधिकारी आहेत. यात अधिक वाढ झाली पाहिजे. गावात एकवेळ रस्ता नसला तरी चालत जावे लागले तरी चालेल पण आपली मुले शिकली पाहिजे. गावकरी समाज मंदिरासाठी ज्याप्रमाणे पुढाकार घेत आहेत त्याचप्रमाणे शाळा सुधारण्यासाठी देखील प्रयत्न झाले पाहिजेत. सामान्य कुटुंबातील मुले शिक्षण घेऊन अधिकारी बनले पाहिजेत यासाठी गावकरी यांनी व शिक्षकांनी प्रयत्नशिल राहणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन केले. यावेळी अनिल देसाई, जगन्नाथ विरकर, दादासाहेब दोरगे यांनी देखील आपली मनोगते व्यक्त केली.

# खा. शरद पवार आज सातारा दौऱ्यावर


**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सातारा :** राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रमुख खा. शरद पवार हे रविवार, दि. ३ डिसेंबर रोजी सातारा जिल्हा दौर्यावर येत आहेत. सकाळी १० वाजता सर्कीट हाऊस पुणे येथून सातार्याकडे मार्गस्थ होणार आहेत. दुपारी १२.३० वाजता सर्कीट हाऊस सातारा येथे त्यांचे आगमन होणार आहे. दुपारी १२.३० ते २.३० यावेळेत खा. शरद पवार हे सर्कीट हाऊस सातारा येथे थांबणार असून जिल्ह्यातील पदाधिकारी त्यांची भेट घेवून विविध विषयांवर चर्चा करणार आहेत. शासकीय विश्रामगृहानंतर दुपारी २.३० वाजता जकातवाडी ता. सातारा येथील माजी आमदार लक्ष्मण माने यांनी आयोजित केलेल्या कार्यक्रमास खा. शरद पवार उपस्थित राहणार आहेत.



शरद पवार

जकातवाडीतील कार्यक्रमानंतर शेंद्रे ता. सातारा येथील अजिंक्यतारा सहकारी साखर कारखान्यावर माजी आ. प्रभाकर घार्गे कुटुंबियांच्या विवाह समारंभास उपस्थित राहून त्यानंतर खा. शरद पवार हे पुण्याकडे रवाना होणार आहेत.







# मनी लॉंड्रिंग प्रकरणी संजय सिंह यांच्याविरुद्ध आरोपपत्र दाखल

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**नवी दिल्ली :** दिल्लीतील मद्य धोरणाशी संबंधित मनी लॉंड्रिंग प्रकरणी आम आदमी पक्षाचे नेते संजय सिंहांविरुद्ध अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) काल (दि.२) राऊस एव्हेन्यू न्यायालयात आरोपपत्र दाखल केले. याप्रकरणी संजय सिंह यांना ऑक्टोबर महिन्यात अटक करण्यात आली होती. तेव्हापासून ते तिहार कारागृहात आहेत. संजय सिंह यांना न्यायालयाने यांना १० नोव्हेंबर रोजी १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली होती. तसेच यानंतर २४ २४ नोव्हेंबर रोजी न्यायालयाने ४ डिसेंबरपर्यंत कोठडी वाढवली होती. संजय सिंह यांनी राऊस अॅव्हेन्यू कोर्ट, दिल्ली उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालयात जामिनासाठी याचिका दाखल केल्या होत्या. मात्र त्यांचा जामीन नामंजूर झाला होता.



संजय सिंह

ईडीचे मनी लॉंड्रिंग प्रकरण केंद्रीय अन्वेषण विभाग (सीबीआय) एफआयआरशी संबंधित आहे. सीबीआय आणि 'ईडी'च्या म्हणण्यानुसार, आता रद्द केलेल्या दिल्ली उत्पादन शुल्क धोरण २०२१-२२ मध्ये सुधारणा करताना अनियमितता करण्यात आली होती आणि परवानाधारकांना बेकायदा लाभ देण्यात आला होता. हे धोरण तयार करणे आणि अंमलबजावणीमध्ये संजय सिंह यांनी महत्त्वाची भूमिका बजावली होती. यामुळे काही दारू उत्पादक, घाऊक विक्रेते आणि किरकोळ विक्रेत्यांना आर्थिक फायदा झाला असा आरोप करण्यात आला आहे.



# नवमतदार नोंदणीसाठी महाविद्यालयांमध्ये विशेष अभियान राबवा : सौरभ राव

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगली :** मतदार याद्यांचा विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रम ५ जानेवारी २०२४ रोजी अंतिम मतदार यादी प्रसिध्दी पर्यंत चालणार आहे. १८-१९ वर्षे वयोगटातील मतदानासाठी पात्र झालेल्या युवकांची मतदार नोंदणी करण्यासाठी महाविद्यालयांमध्ये विशेष अभियान घ्यावे. यामध्ये प्रसार माध्यमे व राजकीय पक्षांचा सक्रिय सहभाग घ्यावा. युथ आयकॉन यांचे कार्यक्रम महाविद्यालयांमध्ये घ्यावेत, अशा सूचना मतदार यादी निरीक्षक तथा पुणे विभागीय आयुक्त सौरभ राव यांनी आज येथे दिल्या.



**सांगली : जिल्हाधिकारी कार्यालयातील बैठक कक्षात झालेल्या बैठकीस उपस्थित खासदार संजय पाटील, पुणे विभागीय आयुक्त सौरभ राव, जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी, उप जिल्हा निवडणूक अधिकारी नीता सावंत-शिंदे, सर्व उप विभागीय अधिकारी, तहसिलदार व मान्यवर**

दिनांक १ जानेवारी २०२४ या अर्हता दिनांकावर आधारित मतदार याद्यांच्या विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रमाच्या आढावा बैठकीच्या अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. जिल्हाधिकारी कार्यालयातील बैठक कक्षात झालेल्या या बैठकीस खासदार संजय पाटील, जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी, उप जिल्हा निवडणूक अधिकारी नीता सावंत-शिंदे, सर्व उप विभागीय अधिकारी, तहसिलदार, मान्यताप्राप्त राजकीय पक्षाचे जिल्हाध्यक्ष/प्रतिनिधी उपस्थित होते.

विभागीय आयुक्त सौरभ राव म्हणाले, राजकीय पक्षांसोबत समन्वय साधून त्यांच्या सूचना, काही आक्षेप असतील तर ते विचारात घ्यावेत. मतदार यादीमध्ये नावे जोडणे, कमी करणे व सुधारणा करत असताना पारदर्शकता व निष्पक्षपणे काम करावे. कोणत्याही यंत्रणेविरूध्द तक्रार येवू नये याची काळजी घ्यावी. या अनुषंगाने एक मोठी जबाबदारी एठज व त्यांच्या अधिनस्त यंत्रणांची आहे. त्यासोबत राजकीय पक्षांचेही दायित्व महत्वाचे असून, कामाला गती देण्यासाठी व पारदर्शकतेसाठी त्यांनी बुथ लेव्हल असिस्टंटची नियुक्ती अपेक्षित संख्येमध्ये तात्काळ करावी. बुथ लेव्हल असिस्टंट बरेचसे प्रश्न सोडविण्यासाठी मदत करू शकतो, असे ते म्हणाले.यावेळी राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींनी त्यांचे काही प्रश्न मांडले. यावर अनुषंगिक कार्यवाही करण्याच्या सूचना विभागीय आयुक्त सौरभ राव यांनी दिल्या.

खासदार संजय पाटील यांनी नवमतदार नोंदणीसाठी सेलिब्रेटी किंवा क्रीडा क्षेत्रातील खेळाडूंकडून आवाहन करावे, असे मत व्यक्त केले.

जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी यांनी मतदार याद्यांच्या विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रमाबाबत आत्तापर्यंत केलेल्या कार्यवाहीबाबत तसेच नवमतदार नोंदणीसाठी करण्यात येत असलेल्या प्रयत्नाबाबत सविस्तर माहिती दिली. प्रारूप मतदार यादीनुसार जिल्ह्यात २४ लाख १२ हजार ८११ मतदार असून यामध्ये पुरूष मतदार १२ लाख ३८ हजार ४५०, स्त्री मतदार ११ लाख ७४ हजार २५० व तृतीयपंथी १११ आहेत. जिल्ह्यात एकूण २ हजार ४२१ मतदान केंद्रे आहेत. प्रत्येक मतदान केंद्रावर राजकीय पक्षांनी बुथ लेव्हल एजंट नियुक्त करावा. काही मदत हवी असल्यास बीएलओ यांच्याशी संपर्क साधावा. दि. २७ ऑक्टोबर २०२३ रोजी प्रारूप मतदार यादी प्रसिध्दी अखेर जिल्ह्यात ३८ हजार ९८४ मतदारांची नोंदणी व ४८ हजार ८८१ मतदारांची वगळणी झाली असल्याचे सांगून नवमतदार नोंदणीसाठी आवश्यक प्रयत्न करीत असल्याचे ते म्हणाले. उप जिल्हा निवडणूक अधिकारी नीता सावंत-शिंदे यांनी आभार मानले.

# राष्ट्रवादी पक्षात येण्यास अनेक जण इच्छुक : जयंत पाटील

**माणदेश एक्सप्रेस न्युज**



**जयंत पाटील**

**पिंपरी- चिंचवड :** राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी पिंपरीतील शरद पवार गटाच्या पक्ष कार्यालयाचे मोठ्या थाटात उद्घाटन केले. यावेळी सभेला संबोधित करत असताना खासगीत अनेक जण पक्षात येण्या संदर्भात बोलतात, पण जाहीरपणे बोलून त्यांना मी अडचणीत आणणार नाही. असं म्हणत त्यांनी अप्रत्यक्षपणे शरद पवार गटात अनेक जण येण्यास इच्छुक असल्याचा स्पष्ट केले आहे. पिंपरीतील राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या पक्ष कार्यालयाचे उद्घाटन जयंत पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी शहराध्यक्ष तुषार कामठे यांच्यासह इतर कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते. त्यांनतर झालेल्या सभेत प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी विरोधकांवर चौफेर टीका करत चांगलीच फटकेबाजी केली.

जयंत पाटील म्हणाले, राज्यामध्ये बदलाचं राजकारण होत आहे. परंतु, हे फार काळ टिकत नाही. आजही अनेक जण शरद पवार गटात येण्यास इच्छुक आहेत. ते मला खासगी बोलतात मी जाहीरपणे बोलून त्यांना अडचणीत आणणार नाही. राज्यातील हे वातावरण कोणामुळे होत आहे? पक्ष फोडण्याचा काम कोण करत आहे? हे चातुर्य कोणाच आहे?, हे महाराष्ट्राच्या जनतेला कळल आहे. म्हणून आगामी निवडणुकांमध्ये त्यांना त्यांची जागा जनताच दाखवेल अशी टीका जयंत पाटील यांनी विरोधकांवर केली. पुढे ते म्हणाले की, चार राज्यातील निकाल लागणार आहे तो काय लागेल हे माहीत नाही पण त्या ठिकाणची जनता प्रचंड त्रस्त होती हे मी सोशल मीडियाच्या माध्यमातून बघायला मिळालं. पिंपरी- चिंचवड शहरांमधील अनधिकृत बांधकाम, रेड झोन अशी अनेक प्रश्न प्रलंबित आहेत. केवळ सत्ताधाऱ्यांनी आश्वासने दिली. पण ते प्रश्न सोडवू शकले नाहीत. पिंपरी-चिंचवडकरांनी सत्ताधाऱ्यांना हा जाब विचारला पाहिजे. पुण्याचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांच्याबाबत बोलताना जयंत पाटलांनी विचारांशी एकनिष्ठ असलेला कार्यकर्ता असल्याचं सांगितलं. त्यांची पुण्याच्या शहराध्यक्षपदी अजित पवार यांनीच नियुक्ती केली होती. तरी देखील ते शरद पवार गटासोबत आहेत. ते एकनिष्ठ आणि विचारांशी बांधिलकी असलेला कार्यकर्ता असल्याचा उल्लेख त्यांनी केला.

# मराठा-कुणबी नोंदी शोधण्यात अडचणींचा डोंगर

## निधीची चणचण, मनुष्यबळाची कमतरता, भाषांतराची समस्या

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**नाशिक :** मराठा-कुणबी नोंदी शोधण्यासाठी राबविलेल्या विशेष मोहिमेत सापडलेल्या कुणबी नोंदी स्कॅन करणे, संकेतस्थळावर टाकणे, यात निधीची चणचण भासत आहे. या कामासाठी मनुष्यबळाची कमतरता आहे. मोडी आणि उर्दू भाषेतील नोंदी मराठीत भाषांतरीत करण्यासाठी मोडी आणि उर्दूवाचकांना मानधन देण्याचाही प्रश्न निर्माण झाल्याचे शिंदे समितीचे अध्यक्ष तथा निवृत्त न्यायमूर्ती संदीप शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली येथे झालेल्या बैठकीत उघड झाले. उपरोक्त प्रश्नांसह जीर्ण नोंदींचे जतन, संकेतस्थळावर स्कॅन स्वरुपात नोंदी समाविष्ट करण्यासाठी सर्व्हरवर जागा आणि त्या अनुषंगाने तांत्रिक बाबींची पूर्तता करण्याची गरज प्रशासनाकडून मांडली गेली.

विभागीय आयुक्त कार्यालयातील नियोजन कक्षात कुणबी, मराठा-कुणबी, कुणबी-मराठा जातीचे प्रमाणपत्र पात्र व्यक्तींना देण्याबाबतची कार्यपद्धती विहित करण्यासाठी समितीची बैठक समितीचे अध्यक्ष न्या. शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. यावेळी सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी आपापल्या जिल्ह्यात कुणबी, कुणबी-मराठा, मराठा-कुणबी नोंदी शोधण्याबाबत चाललेल्या कामकाजाची माहिती सादर केली.

# बांगलादेशचा न्यूझीलंडवर ऐतिहासिक कसोटी विजय !

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**नवी दिल्ली :** तैजुल इस्लामच्या (१० विकेट्स) घातक फिरकी गोलंदाजीच्या जोरावर बांगलादेशने सिल्हेत येथे खेळल्या गेलेल्या पहिल्या कसोटीत न्यूझीलंडचा १५० धावांनी पराभव केला. बांगलादेशने न्यूझीलंडला विजयासाठी ३३२ धावांचे लक्ष्य दिले होते. प्रत्युत्तरात पाहुणा किवींचा संघ केवळ १८१ धावांवरच गारद झाला. या विजयासह बांगलादेशने २ सामन्यांच्या कसोटी मालिकेत १-० अशी आघाडी घेतली आहे.


**न्यूझीलंडच्या खेळाडूला बाद केल्यावर आनंद व्यक्त करताना बांगलादेशचे खेळाडू**

चौथ्या दिवसाचा खेळ संपेपर्यंत न्यूझीलंडने ४९ षटकांत ७ गडी गमावून ११३ धावा केल्या होत्या. शेवटच्या दिवशी न्यूझीलंडला विजयासाठी २१८ धावांची तर बांगलादेशला विजयासाठी ३ विकेट्सची गरज होती. पाचव्या दिवशी किवींनी पुढे खेळण्यास सुरुवात केली तेव्हा मैदानावर डॅरेल मिशेल आणि इश सोधी होते. या दोघांवर कसोटी वाचवण्याची जबाबदारी होती. त्यांनी संयमी फलंदाजीला सुरुवात केली. पण त्यांचा बांगलादेशच्या गोलंदाजीपुढे पुढे टीकाव लागला नाही. मिशेलचा (१२० चेंडूत ५८ धावा) अडसर नईम हसनने दूर करून किवींना आठवा धक्का दिला. त्यानंतर सोधीने (९१ चेंडूत २२ धावा) टीम सौदीच्या (२४ चेंडूत ३४ धावा) साथीने डाव सांभाळला आणि धावफलक हलता ठेवला. दोघांनी ९व्या विकेटसाठी ४६ धावांची सर्वोच्च भागिदारी केली. पण तैजुल इस्लामने सौदी पाठोपाठ सोधीला बाद करून बांगलादेशच्या विजयावर शिक्कामोर्तब केला.

दुसऱ्या डावात न्यूझीलंडच्या फलंदाजांनी हाराकिरी केली. बांगलादेशाच्या फिरकी पुढे त्यांनी अक्षरशः लोटांगण घातले. टॉम लॅथम (०), डेव्हॉन कॉनवे (२२), केन विल्यमसन (११), हेन्री निकोल्स (२), टॉम ब्लंडेल (६), ग्लेन फिलिप्स (१२) यांच्या निराशाजन कामगिरीमुळेच त्यांना लाजिरवाण्या पराभवाला सामोरे जावे लागले.

बांगलादेशने दुसऱ्या डावात शानदार कामगिरी करत सर्वबाद ३३८ धावा केल्या. कर्णधार शांतोने संघासाठी १०५ धावांची शानदार शतकी खेळी साकारली. याशिवाय मुशफिकुर रहीमने ६७ तर मेहंदी हसन मिराजने ५० धावा केल्या. अशाप्रकारे किवींना विजयासाठी ३३२ धावांचे लक्ष्य दिले. किवींच्या एजाज पटेलने ४ बळी घेतले. प्रत्युत्तरार न्यूझीलंडचा संघ दुसऱ्या डावात पूर्णपणे फ्लॉप ठरला. त्यांचा संपूर्ण संघ १८१ धावांवर ऑलआऊट झाला. बांगलादेशकडून इस्लामने ३१.१ षटकात ७५ धावा देत ६ बळी घेतले. एकूण सामन्यात त्याने १० बळी पटकावण्याची किमया केली. त्याला सामनावीर पुरस्काराने गौरविण्यात आले.

# बनावट नोटांचे रॅकेट उध्वस्त

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**मुंबई :** राष्ट्रीय तपास संस्थेने (एनआयए) चार राज्यामध्ये छापे टाकून बनावट नोटांचे निर्मितीचे रॅकेट उध्वस्त केले. महाराष्ट्रासह उत्तर प्रदेश, कर्नाटक आणि बिहारमध्ये करण्यात आलेल्या कारवाईत ५००, २०० आणि १०० रुपयांच्या बनावट नोटांसह प्रिंटिंग पेपर, प्रिंटर आणि डिजिटल गॅझेट्ससह जप्त करण्यात आल्या आहेत.

सीमेपलीकडे बनावट नोटांची वाहतूक करणे आणि भारतातील विविध राज्यांमध्ये त्यांच्या चलनाला वापर करणाऱ्या मोठ्या कटाचा भाग असल्याचा संशय असलेल्या व्यक्तींवर छापे मारण्यात आले. या कारवाईसंदर्भात 'एएनआय'शी बोलताना उत्तर प्रदेशमधील शाहजहांपूरचे अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुधीर जयस्वाल यांनी सांगितले की, राष्ट्रीय तपास संस्थेच्या बंगळूर येथील टीमने विवेक ठाकूर उर्फ आदित्य सिंगला अटक केली आहे. त्यांच्याकडून एक लॅपटॉप आणि दोन फोन जप्त करण्यात आले. बनावट नोटा तयार केल्याप्रकरणी ही कारवाई करण्यात आली आहे.





# राजेश टोपे यांच्या कारवर हल्ला

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**जालना :** माजी मंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाचे नेते राजेश टोपे यांच्या कारवर काल (दि. २) हल्ला करण्यात आला. अज्ञात लोकांकडून जालना जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या खाली उभ्या असलेल्या टोपे यांच्या गाडीवर दगडफेक करण्यात आली. या हल्ल्यात त्यांच्या गाडीचे नुकसान झाले आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, जालन्यात जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या निवडणुका सुरु आहेत, त्यानिमित्ताने राजेश टोपे जिल्हा मध्यवर्ती बँकेत दाखल झाले होते. राजेश टोपे यांची गाडी जिल्हा बँकेच्या इमारतीजवळ उभी असताना त्या ठिकाणी त्यांच्या गाडीच्या समोरील भागावर दगडफेक करण्यात आली.


**जालना : माजी मंत्री आम. राजेश टोपे यांच्या गाडीवर हल्ला करण्यात आला असून यामध्ये गाडीचे झालेले नुकसान**

दरम्यान, घटनास्थळी अपर पोलीस अधीक्षक उपविभागीय पोलिस अधिकारी सदर बाजार पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक दाखल झाले. यावेळी टोपे यांच्या गाडीजवळ एक लाकडी दांडा आणि ऑइलची बाटली देखील आढळून आली आहे.

राजेश टोपे यांच्या गाडीवर हल्ला कोणी केला हे समजू शकलं नाही, त्यामुळे यातील आरोपीचं अद्याप समोर आलेलं नाही. या घटनेत त्यांच्या गाडीच्या समोरची काच फुटली आहे. गाडीजवळ एक लाकडी दांडा आणि ऑइलची बाटली देखील सापडलेली आहे. पोलीस घटनास्थळी दाखल झालेली असून मराठवाड्यात गेल्या काही दिवसांपासून राज्याच्या राजकारणाच्या केंद्रस्थानी जालना जिल्हा सध्या चर्चेत आहे.

